विशाखा समिती : कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, निवारण) अधिनियम, २०१३: प्रात्यक्षिक कार्य व सादरीकरण

(वेळ मर्यादा ३० मिनिटे)

१. प्रशिक्षणार्थींचे सहा गट पाडावेत.
२. प्रत्येक गटाला एक एक केस देऊन तशी समितीकडे केस आल्यास समितीने कोणती कार्यपद्धती अवलंबावी त्याचा तपशील तयार करण्यास सांगावे.
३. प्रत्येक गटाचे खालीलपैकी सादरीकरण घ्यावे प्रत्येक गटाला सादरीकरणासाठी ५ मिनिटे द्यावीत.

केस नं: १

एका महिलेला कार्यालयातील एक व्यक्ती गेले दोन तीन महिने अश्लिल मेसेजेस तिच्या मोबाईलवर पाठवत होता. त्या महिलेने एक दिवस कार्यालयातील महिला तक्रार निवारण समितीच्या एका सदस्याकडे जाऊन तोंडी तक्रार केली. समितीच्या सदस्याने त्या व्यक्तीला तोंडी समज दिले, परंतु संबंधित व्यक्तीचे मेसेजेस सुरुच राहिले. ही केस समितीपुढे आली.

केस नं: २

एका महिलेने अशी लेखी तक्रार समितीकडे दिली की, कार्यालयातील एका व्यक्तीकडून तिला सतत वाईट कॉमेंट्स ऐकायला मिळत होत्या. त्या घटनेला कुणीही साक्षीदार नाहीत. तक्रार मात्र समितीकडे आलेली आहे.

केस नं: ३

एका संस्थेत विशाखा समिती आहे. पण कागदोपत्री आहे. त्या समितीमध्ये सर्व पुरूष सदस्य आहेत. संस्थाचालक, प्राचार्य, पुरूष सदस्य आहेत. संस्थाचालक प्राचार्य, विविध संघटना यांच्या दबावामुळे तक्रारच नोंदवून घेतली जात नाही. तक्रार नोंदवायला गेलेल्या महिलेलाच बदनामीची धमकी दिली जात आहे.

केस नं: ४

एका संस्थेतील महिलेने तिच्या विभाग प्रमुखांकडे अशी तक्रार केली की, त्या संस्थेत बाहेरून व्यख्यान देण्यासाठी येणाऱ्या एका व्यक्तीकडून तिला अस्वागतार्ह इशारे केले जात आहे. कार्यालय प्रमुखाने ही तक्रार समितीकडे नेली.

केस नं: ५

एका महिलेने समितीकडे लेखी तक्रार केली की, कार्यालयातील एक व्यक्ती तिचा लैंगिक छळ करत आहे. समितीने त्या महिलेला तपशिल विचारण्यासाठी बोलवले परंतु बोलवल्यानंतर त्या महिलेने अधिक तपशील सांगण्यास नकार दिला.

केस नं: ६

एका कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याला महिला अधिकारीने काम न केल्याबद्दल समज दिली. त्यानंतर त्या कर्मचाऱ्यास अशी भीती वाटली की, सदर अधिकारी आपल्या विरुद्ध लैंगिक छळाची तक्रार करतील. त्यामुळे त्या कर्मचाऱ्याने महिला अधिकारी विरूद्ध एक निवेदन कार्यालय प्रमुखांना दिले. त्या निवेदनात असे म्हटले होते की, सदर महिला अधिकारीने मला माझी जागा दाखविली. सदर केस कार्यालय प्रमुखाने समितीकडे पाठविली.